# तहसिल कार्यालय, वाळवा-इस्लामपूर (निवडणूक शाखा)
# 283 इस्लामपूर विधानसभा मतदार संघ

- मा.भारत निवडणूक आयोग, मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य व मा.जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, सांगली , मा.मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वाळवा विभाग इस्लामपूर व मा.सहा.मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार वाळवा-इस्लामपूर यांचेकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार कामकाज केले जाते.
- निवडणूक शाखा यांचेमार्फत विधानसभा मतदार संघामधील वय वर्षे १८ पूर्ण झालेल्या मतदारांची नोंदणी फॉर्म नं.६ भरून कागदपत्रांची पडताळणी करून (ऑनलाईन/ऑफलाईन) पद्धतीने करण्यात येते.
- मतदार संघातील मतदार जर मयत,स्थलांतरीत व दुबार असेल तर अशा मतदारांची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्या मार्फत पडताळणी करून पडताळणी मध्ये खात्री झालेनंतर अशा मतदारांबाबत फॉर्म नं ७ भरून घेवून कुटुंबातील व्यक्ती अथवा पंचनामा करून अशा मतदारांची नावे कमी केली जातात.
- मतदार संघातील मतदारांचे ईपिक कार्डबाबत दुरुस्त असल्यास त्याबाबत त्या मतदारांकडून नमुना नं.८ भरून योग्य ती दुरुस्तीबाबत कार्यवाही केली जाते.
- मतदार संघामध्ये एकूण २९० मतदान केंद्र असून प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांची नेमणूक करणेकामी कामकाज केले जाते. तसेच २९० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांचे कामकाजावर देखरेख व नियंत्रण करण्याकरिता या शाखेमार्फत एकूण २९ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्याचे कामकाज केले जाते.
- निवडणूक शाखेमार्फत लोकसभा सार्वत्रिक निवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक संदर्भात संपूर्ण कामकाज पारदर्शक होण्याच्या दृष्टीने कामकाज केले जाते. तसेच शिक्षक व पदवीधर निवडणूक विषयक संपूर्ण कामकाज केले जाते.
- मतदार संघामध्ये असलेल्या मतदान केंद्रांची क्षेत्रीय अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांचेमार्फत पाहणी करून मतदान केंद्रांबाबत आढळून आलेल्या बाबींवर प्रत्येक वर्षी मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करण्याचे कामकाज केले जाते.
- ज्या नवं मतदारांनी मतदार म्हणून नमुना नं.६ भरून नोंदणी केली आहे तसेच ज्या मतदारांची नावे मतदार यादी मध्ये असूनही त्यांच्या माहितीच्या तपशीलामध्ये (उदा. नाव, पत्ता, लिंग, वय, छायाचित्र, मोबाईल नंबर व इतर) काही दुरुस्त असल्यास त्यांनी नमुना फॉर्म नं.८ भरल्यानंतर येणारे ईपिक कार्ड सबंधित मतदारांना या कार्यालामार्फत रजिस्टर पोस्टाने पाठविणेबाबत कामकाज केले जाते.
- मतदारांनी NGSP PORTAL वर online पद्धतीने केलेल्या तक्रारीचे निराकरण या शाखेमार्फत केले जाते.
- निवडणूक शाखेमार्फत Defence, Army मध्ये सेवा कार्यरत असलेल्या सैनिक मतदार म्हणून नोंदणी होणेकामीचे फॉर्म सबंधित कार्यालयाकडून ऑनलाईन पद्धतीने या कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर सदरचे फॉर्म मतदार नोंदणी अधिकारी हे पडताळणी करून अशा मतदारांनाच्या नोंदणीबाबत योग्य तो निर्णय घेण्याचे कामकाज केले जाते.
- निवडणूक शाखेत भेट देणाऱ्या नागरिकांचे/मतदारांचे मतदार नोंदणी व त्याअनुषंगाने निवडणूक विषयक कामकाजाबाबत असलेल्या शंकेचे निरसन केले जाते.




मतदार जागृती अभियान


मतदार जागृती अभियान





